Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

* वार्तापत्र *

वर्ष : 2 रे • अंक : 1 ला
ऑक्टो. – डिसेंबर 2022
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

# संपादकीय ...

गेल्या अडीच वर्षात जगभर आलेले कोविड विषाणू चे संकट आता जवळपास संपलेले आहे आणि आता आपण कोविड मुळे घातलेले निर्बंध संपवून पुन्हा एकदा खुल्या आणि मोकळ्या जगात प्रवेश करतो आहोत .

आमचे वार्तापत्र आता दुसऱ्या वर्षात प्रवेश करीत आहे. गेल्या एका वर्षात आम्ही आमच्या वार्तापत्राद्वारे समाजातील जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याचा आणि त्याद्वारे लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे. आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या मेट्रोपॉलिस या कंपनीने समाजातील आरोग्य क्षेत्रातील व्यक्ती आणि संस्था यांची पाहणी केली आणि ज्या व्यक्तींनी रुग्ण सेवेला उच्च प्राधान्य दिले आहे आणि जे लोक व संस्था लोकांची मोफत आरोग्य सेवा करतात अशांना Healthcare Heroes of India Award. देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे आम्हाला हे कळविण्यास आनंद होतो कि आपल्या मायाकेअर या संस्थेला दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले आहे .

प्रत्येकजण आपल्या तरुणपणी आपल्या स्वप्नांचा पाठलाग करत असतो आणि त्यासाठी शिक्षण घेत असतो, नोकरी करीत असतो आणि किंवा उद्याचे उद्या पाहू असेच वागत असतो पण त्याचवेळी , वृद्ध लोक जे असतात त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते त्यांच्या गरजा पूर्ण करणे किंवा इच्छापूर्ती करणे याकडे लक्ष दिले जात नाही. भारतात, ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीय आहे आणि 2050 पर्यंत देशाच्या एकूण लोकसंख्येच्या 20 टक्क्यांहून अधिक लोकसंख्येचा ज्येष्ट नागरिकांमध्ये समावेश होईल असा अंदाज आहे.म्हणून वृद्ध लोकांना मदत करणे आणि त्यांच्या राहणीमानात सकारात्मक बदल घडवून आणणे ही काळाची गरज आहे. कारण भारताच्या लोकसंख्येतील वृद्ध लोकांचा भाग मोठा आहे व त्यांची बहुतेक परिस्थिती खेदजनक आहे, आणि ही एक प्रमुख सामाजिक स्थिती आहे. वृद्धांच्या त्यांच्या ढासळत्या आरोग्यामुळे, आर्थिक कमतरतेमुळे व शारीरिक हतबलतेमुळे त्यांची अगतिकता वाढते आणि त्यासाठी समाजाने निर्माण केलेले दुर्लक्ष कारणीभूत आहे.

वृद्धांच्या गरजा आणि त्यांच्यासमोरची आव्हाने लक्षात घेऊन त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी अनेक गैर–सरकारी संस्था कार्यरत आहेत. वृद्ध लोकांसाठी असलेल्या या स्वयंसेवी संस्थांनी वृद्धांना त्यांच्यासमोर येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यास केवळ मदतच केली नाही तर अशा समस्यांबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण केली आहे.अशा अनेक संस्था कार्यरत असताना टाटा यांनी गुडफेलोज नावाची संस्था स्थापन केली आहे या संस्थेचे कार्यकर्ते जेष्ठ नागरिकांना सोबत (Companionship) देतील . वृद्धांची सेवा करणाऱ्या संस्थांमध्ये टाटा सारख्या नामवंत संस्थेचे आम्ही स्वागत करतो .

भारतीय राज्यघटनेतील आर्टिकल 41 खालिलप्रमाणे आहे Article 41. The state shall, within the limits of its economic capacity and development, make effective provision for securing the right to public assistance in cases of old age. सामाजिक सुरक्षितता हि केंद्र व राज्य सरकारची संयुक्त जबाबदारी आहे सन 2011 मध्ये केंद्र सरकारने एक राष्ट्रीय धोरण जाहीर केले आहे (The National Policy of Senior Citizens 2011) त्यानुसार वृद्धांना पेन्शन , प्रवास करण्यासाठी सवलती ,आयकरात सूट ,वैद्यकीय सुविधा ,ठेवींवर जादा व्याजदर ,जेष्ठ नागरिकांची सुरक्षा, डे केअर सेन्टर्स, आणि वृद्धांसाठी हेल्प लाईन्स अशा अनेकविध योजना आखलेल्या आहेत.

आजच्या अंकात आम्ही याबाबत केलेले प्रयत्न यांची माहिती दिलेली आहे . आम्ही आम्हाला आर्थिक पाठबळ देणाऱ्या व्यक्तींचे आणि संस्थांचे अत्यंत आभारी आहोत.

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

मी सदाशिव नागोजी यादव. मी 85 वर्षे वयाचा असून मी NIBM कोंढवा, पुणे  येथे राहतो आमच्या एका ज्येष्ठ महिला शेजाऱ्याकडून मला माया केअर फाऊंडेशनची माहिती मिळाली. माझ्या पत्नीचे निधन झाल्यामुळे आणि मुले परदेशात असल्यामुळे मी एकटाच राहतो. तेव्हा मला अशा सेवेची गरज होती. मी Helpline ला फोन केल्यावर माधुरी मॅडम यांनी मला अतिशय सुयोग्य अशा श्री महेश कुलकर्णी या स्वयंसेवकाला माझी मदत करण्यास पाठवले. श्री कुलकर्णी यांनी मला मुकुंदनगर येथून औषधे आणून देण्यास दोनदा मदत केली.

श्री कुलकर्णी हे अतिशय समर्पित स्वयंसेवक असून माझी तीन चार आठवड्यातून एकदा फोनवर विचारपूस करतात. याशिवाय माझ्या पत्नीचे मृत्यू प्रमाणपत्र   आणण्यास व मोबाईल रिचार्ज करण्यास त्यांनी मदत केली. या संस्थेच्या सेवा अतिशय उत्तम असून त्या घेण्याची मी ज्येष्ठांना नक्कीच शिफारस करेन. मी माया केअर फाउंडेशन चा खूप आभारी आहे .

श्री  सदाशिव यादव मो. 9657830310

****

मी श्रीमती पुष्पा यशवंत कुलकर्णी, पुणे. माझे पती श्री यशवंत कुलकर्णी (80) यांचे नुकतेच कोरोनामुळे निधन झाले. कोरोना साथीच्या कठीण काळात माया केअर संस्थे तर्फे श्री दफ्तरदार, श्री बागुल व श्री भडकमकर या स्वयंसेवकांनी त्यांना फिरायला घेऊन जाणे, पुस्तक वाचून दाखवणे, गरजेच्या वस्तू आणून देणे इ. सेवा दिल्या. श्री भडकमकर देखील त्यांना मानसिक आधार देत. श्री बागुल त्यांना माऊथ ऑर्गन वर गाणी वाजवून दाखवत आणि त्यांना आनंद देत असत.या सेवांबद्दल मी माया केअर फाउंडेशची खूप आभारी आहे.

****

In the last few years that we have known Hemant Tikekar from MayaCare., He has been a rock of support for our family. From helping us find assistants to look after my 93-year old mom, to giving us advice on medical support, to just being there when we needed a strong hand of support through our darkest moments, Hemant has always been there for us. He is selfless, caring, thoughtful and generous and never hesitates to provide immediate support and advice no matter what his current personal circumstances are. We are truly blessed and privileged to know Hemant.

- Marilyn Dyer, Pune.

****

मा वय 73 वर्षे आहे. मी टाटा कॅन्सर हॉस्पिटल मुंबई येथे ट्रीटमेंट साठी नेहमी जात असतो. यासाठी मला आपला स्वयंसेवक अक्षय भांगरे हा नेहमी मदत करतो. एकदा तर तो जवळजवळ पाच ते सहा ठिकाणी माझ्यासाठी फिरत होता. आपल्या संस्थेच्या नावांमधील माया हा शब्द आहे तो पूर्णपणे सार्थ ठरतो. आपल्या माया केअर फाउंडेशन ची अतिशय उत्तम सेवा आहे.

श्री. दिलीप मगर मुंबई

****

# माया केअर वृत्त

१ .' आजादी का अमृत महोत्सव' अंतर्गत माया केअर संस्थेतर्फे सूर्योदय महिला वृद्धाश्रम, डी.एस.के. चौक धायरी पुणे येथे एक गुलाबाचे रोपटे ज्येष्ठ महिलेच्या हस्ते लावून वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला स्वयंसेवक श्री.महेश कुलकर्णी व श्री.संतोष महाजन उपस्थित होते. यानंतर श्री.महेश कुलकर्णी यांनी महिलांकरीता गोंदवलेकर महाराजांच्या प्रवचनाचे पठण केले.

२. स्वातंत्र्यानंतरचा भारत निश्चितच चांगला आहे. पण अनेक प्रश्नांची उकल झाली पाहिजे असे प्रतिपादन पुणे येथील ज्येष्ठ निवृत्त शिक्षक आणि आमचे लाभार्थी श्री. दादासाहेब शुक्ल (85) यांनी माया केअर ला दिलेल्या मुलाखतीत दिले. 75 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त माया केअर स्वयंसेवकांनी त्यांची मुलाखत घेतली. श्री दादासाहेब शुक्ल यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कडगांव येथे ३५ वर्षे शिक्षक म्हणुन सेवा दिली आणि त्यानंतर समाजसेवा म्हणून अनेक मंदिरे, वाचनालये उभारण्यासाठी हातभार लावला. स्वातंत्र्यापूर्वी अनेक बंधने होती आणि महिलांना चूल आणि मूल यातच अडकून राहावे लागायचे असे त्यांनी सांगितले. 15 ऑगस्ट 1947 रोजी तालुक्यातुन अधिकारी आले व त्यांच्या शाळेत ध्वजवंदन आणि राष्ट्रगीत झाले. तो प्रसंग रोमांचकारी होता असेही त्यांनी सांगितले.

३) सवंगडी ज्येष्ठ नागरिक संघ कोथरूड, सेंट अँड्र्युज मराठी चर्च खडकी, नवसह्याद्री ज्येष्ठ नागरिक संघ इ. पुण्यातील ठिकाणी माया केअरच्या सेवांची माहिती देण्यात आली. तसेच श्रीमती. पुष्पा यशवंत कुलकर्णी यांच्या पतीच्या प्रथम स्मृतदिनानिमित्त माया केअरच्या सेवांची महिती देण्यात आली. या प्रसंगी 100 नागरिक उपस्थित होते.

४) समर्थनम ट्रस्ट संस्थेच्या दिव्यांग रोजगार मेळाव्यात एस. एन. डी. टी. कॉलेज, हडपसर आणि वाघोली पुणे येथे माया केअर तर्फे दिव्यांग उमेदवारांना काम देण्यात आले. यावेळी माया केअर संस्थेचा स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

५) कोल्हापूर येथे आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक वसंतराव ज्ञानदेव माने यांची स्वातंत्र्य पूर्व काळाबद्दल परखड अशी मुलाखत स्वयंसेवक संजय कुलकर्णी यांनी घेतली. वसंतराव माने यांनी 32 वर्षे शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम केले ते कासेगाव महाविद्यालयाचे मुख्याध्यापक देखील राहीले आहेत.

त्या काळामध्ये व्यापार, उद्योगधंदे बंद पडले होते.तसेच वाहतुकीच्या सोयी नसल्यामुळे बैलगाडी ने प्रवास करायला लागत असे.त्या काळामध्ये इंग्रजांकडून सक्तीने कर वसुली होत होती. भारतीय क्रांतिकारकांनी तासगाव ताकारी येथे इंग्रजांची रेल्वे अडवून पैशांची लूट करून इंग्रजांना कसे जेरीस आणून सोडले होते.व महिलांना शिक्षणाच्या कोणत्याही सुविधा नव्हत्या अक्षरश: त्यांना जात्यावर दळण दळायला लागत असे. अशा प्रकारची महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी दिली. तसेच कोल्हापुरातील मातोश्री वृद्धाश्रम येथे माया केअर च्या स्वयंसेवकांनी देशभक्तीपर गाण्यांचे सादरीकरण करून ज्येष्ठ नागरिकांना आनंद दिला.

## श्रद्धांजली

आम्ही सेवा देत असलेल्या खालील ज्येष्ठ नागरिकांचे दु:खद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली

सौ. लता ढेरे    श्री. श्रीरंग मोघे    श्री. मनोहर संगमनेरकर    श्री. सुभाष नाईक

**Age is an issue of mind over matter. If you don't mind, it dosen't matter.**
**- Mark Twain**

# आम्हाला आधार देणारे माया केअर चे स्वयंसेवक श्री संदीप नेरकर

सध्या, मी श्री मुजुमदार वय वर्षे 84 आणि माझी पत्नी वय वर्षे 79 औंध, पुणे येथे दोघेच राहतो. काही नेहमीच्याच व्याधी मुळे आम्हाला चालण्यास त्रास होतो. आम्हाला काठी बरोबर असल्याशिवाय घराबाहेर पडता येत नाही.

माझ्या काही बँकेच्या कामासाठी आपणाकडून श्री संदीप नेरकर हे स्वयंसेवक माझ्याकडे साधारण पणे 2 ते 3 वर्षीपूर्वी आले होते त्या वेळी माझे बँकेचे काम आणि Property Tax भरावयाचे काम त्यांनी अगदी आनंदाने पूर्ण केले आणि मी दिलेले आभारही घेतले नाहीत. .आम्ही आमच्या आनंदासाठीच जेष्ठ नागरिकांचे काम करीत असतो असेही त्यांनी सांगितले. स्वत: कॉन्ट्रॅक्टर असल्यामुळे माझ्या काही घर दुरुस्तीच्या कामात त्यांचा योग्य तो सल्ला आणि सहभाग याचाही मला लाभ झाला. त्यांना काही थोडेफार मोठे काम सांगताना मलाच अवघडल्या सारखे होत असे पण तसली कामेही ते सहजपणे पूर्ण करीत. त्या पैकी एक काम म्हणजे मी स्वयंपाकघरात पाईप गैस घेतल्या मुळे LPG गैस परत करण्याचे Cylinder परत करण्याचे आणि Security Deposit परत घेण्याचे काम ही सर्व कामे त्यांनी सहजपणे त्याचे कसले ही Credit न घेता पूर्ण केली.

इतक्यातच आम्हा उभयतांच्या Passport ची मुदत संपत आली आहे असे सुचित केले असता Passport Renewal काम करण्याची जबाबदारी त्यांनी घेतली. 3 ते 4 महिन्यापूर्वी त्यांनी Passport Renewal form आणून त्यात सर्व माहिती योग्य प्रकारे भरून आम्हाला ती दाखवून तो Form passport Office मध्ये सादर केला त्यावर त्या कार्यालयात योग्य ती प्रकिया पूर्ण होऊन मी आणि माझी पत्नी सौ. मंदाकिनी दोघानाही दि. 30 जून ला passport Office मध्ये पुढील कारवाई करिता उपस्थित राहण्याची सूचना मिळाली. त्यांना मीही ही माहिती कळवली असताना त्यांनी मी तुम्हा दोघांनाही कोरेगांव पार्क मधील पासपोर्ट कार्यालयात घेऊन जाईन आणि तेथील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर परत तुमच्या घरी आणून सोडेन असे आम्हाला विश्वस्त केले.

आमची उपस्थितीची वेळ 3/6/2022 ला दुपारी 4 वाजता होती. श्री नेरकर कु. सोनाली देवगिरीकर यांना बरोबर घेऊन त्यांच्याच गाडीतून दुपारी 2 वाजता आमच्या घरी येऊन आम्हाला 3.11 वाजता तेथे घेऊन गेले. आम्हाला दोघांनाही योग्य प्रकारे चालता येत नाही, जिना किंवा पायऱ्या असल्यास फार त्रास होतो त्या मुळे कु.सोनाली माझ्या बरोबर आणि स्वतः श्री नेरकर सौ. मंदाकिनी बरोबर 4 वाजता पासपोर्ट कार्यालयात निरनिराळ्या विभागात घेऊन गेले आणि तेथील 4-5 ठिकाणच्या प्रकिया पूर्ण करून दुपारी 4.20 ला आम्हाला पासपोर्ट कार्यालयातून बाहेर घेऊन आले आणि संध्याकाळी 5.40 ला त्यांनी आम्हाला घरी औध मध्ये पोहोचवले. या सर्व प्रक्रियेत त्या दोघांनाही आमची सर्व प्रकारची काळजी घेतली.

माया केअरच्या ऑक्टोबर 2021 मध्ये झालेला या Get Together या कार्यक्रमात ते मला आणि इतर 3-4 ठिकाणी नेहमी मदत करीत असणाऱ्या एक आजी आणि आजोबा यांना घेऊन आले होते. त्याची आठवण होत आहे. माया केअरला श्री संदीप नेरकर सारखे कार्यकर्ते आणि आमच्या सारख्या जेष्ठ नागरिकांना योग्य ती मदत करणारे कार्यकर्ते मिळाले आहेत. बरेच वेळा त्यांनाच बोलवण्यापेक्षा आपण फोन करून दुसऱ्या कामवालीला बोलवावे असे मला वाटायचे पण तुम्ही काळजी करू नका मीच तुमचे काम करत असल्याचे मी मायाकेअरला कळवीन असे ते मला सांगतात. श्री संदीप नेरकर हे आता आमच्या सध्याच्या जीवनात एक मोठे सहकारी झाले आहेत . त्याचे आभार मानल्यास ते दरवेळीच ना करतात त्या मुळे त्यांच्याबद्ल आमच्या भावना आपणास कळवीत आहे. मलाच नव्हे तर इतरही जेष्ठ नागरिकांना आपला व्यवसाय सांभाळून श्री. नेरकर नेहमी मदत करीत असतात. आम्हा सर्वानाच त्यांचा आधार वाटतो. त्यांचे या बद्दल मन:पूर्वक अभिनंदन ! मुख्य म्हणजे त्यांनी केलेल्या मदती बद्दल त्यांनी कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करणे. याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

श्री. मुजुमदार
बी–9 गार्डन इस्टेट , नागरस रोड औंध पुणे – 411067 फोन न. 9970159890

# एक अनुभव

जुलै 2012 मध्ये मी बँकेतील सेवेमधून सेवानिवृत्त झाल्यावर 2013 पासून एका वृद्धाश्रमात स्वयंसेवक म्हणून काम करायला सुरुवात केली. तेथील वृद्धांची बँकांची कामे, त्यांना लागणारी औषधे आणून देणे, त्याना आवश्यक असेल तर त्यांची पेन्शनची कामे करणे, त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड काढून देणे, त्यांच्या डोळयांच्या विशेषतः मोतीबिंदूच्या ऑपेरेशन साठी मदत करणे वगैरे कामे करायला सुरुवात केली. कोविड चा प्रसार होईपर्यंत माझी हि कामे नित्यनेमाने चालू होती .कोविडच्या काळात सुमारे दीड वर्षे हि कामे बंद होती, आता ही पुन्हा नित्यनेमाने सुरु झाली आहेत.

ती कामे करताना एक वृद्धा माझ्याकडे आली त्यांचे नाव रेवती गोरे (नाव मुद्दामून बदलले आहे ). तिने मला सांगितले कि दहा वर्षापेक्षा जास्त दिवस झाले, मला माझा मुलगा कुठे आहे ? तो हयात आहे कि नाही किंवा असल्यास सुखरूप आहे कि नाही याचा पत्ता नाही . मी पोलीस स्टेशनला गेलो तेव्हा त्यांनी सांगितले कि त्याचा फोटो आणा आणि तो नसल्याने मी काही करु शकलो नाही. तो कोल्हापूर जिल्यातील जयसिंगपूर येथील एका कारखान्यात काम करीत होता. त्या कारखान्याचे नाव त्यांच्या डायरीत होते. इंटरनेट वर शोध घेऊन आम्ही त्या कारखान्यात फोन केला असता त्यांनी सांगितले कि, असा कोणी माणूस आमच्या कारखान्यात नाही आणि कधी नव्हताच. आमच्या कारखान्यात काँट्रॅक्टवर नेहमी लोक असतात, पण त्यांचे रेकॉर्ड सर्व कॉन्ट्रॅक्टर कडे असते. ,त्यामुळे आम्हाला काही सांगता येत नाही . नंतर त्यांच्या डायरीत त्यांच्या मुलाच्या एका मित्राचा फोन नंबर सापडला, त्याला फोन केला असता त्याने सांगितले कि माझीही त्याची गेली पाच वर्षे झाली भेट नाहीय पण सुमारे पाच वर्षांपूर्वी तो जेव्हा भेटला होता तेव्हा त्याने मला सांगितले कि तो पुण्यातील नांदेड सिटी म्हणून एक मोठी बांधकामाची साईट आहे, तिथे सिक्युरिटी गार्ड म्हणून कामाला होता. पुण्यात नांदेड सिटी नावाचा बांधकामाचा प्रकल्प खूप मोठा आहे. सुमारे 700 एकर जागेवर हा प्रकल्प आहे 1200 पेक्षा जास्त फ्लॅट्स असून अजूनही बांधकाम चालू आहे . मग आम्ही त्या साईटवर गेलो, जवळपास एक गावच वसले आहे. तिथे चौकशी केली तर तिथेही तो नव्हता आणि तिथे आठदहा सिक्युरिटी कंपन्यांचे गार्ड काम करतात. त्यामुळे काही माहिती मिळाली नाही. तिथे काम करीत असलेल्या सर्व कंपन्यांचे फोन नंबर आणि त्या कंपन्यांचे पत्ते घेतले ,आणि त्यातील एक कंपनीचे ऑफिस अगदी समोरच होते म्हणून आम्ही त्या कंपनीत गेलो . त्या कंपनीत तो पूर्वी कामाला होता पण त्याने तेथील नोकरी सोडली होती, तेव्हा आम्ही त्यांना विंनती केली कि त्याचा फोटो तुमच्याकडे असेल तर द्या . त्याने नोकरीसाठी अर्ज करताना दिला असेल तर त्या अर्जात फोटो असेल ; जर मिळाला तर द्या. निदान आम्हाला पोलिसात तरी देता येईल. त्या कंपनीचा व्यवस्थापक एक भला माणूस होता. त्याने सगळे जुने रेकॉर्ड काढले आणि त्याचा अर्ज शोधला. त्यावरील फोटोचा आता त्यांना काहीच उपयोग नव्हता, त्यामुळे त्यांनी तो देऊन टाकला. तेव्हा मी त्या व्यवस्थापकाला सांगितले कि तुमच्या कंपनीतील लोकांकडे चौकशी करा, त्याच्या सहकाऱ्यांकडे . तो सध्या कुठे आहे ती माहिती कदाचित मिळू शकेल आणि जर काही माहिती मिळाली तर मला फोन करून सांगा म्हणून मी माझा मोबाईल नंबर त्यांना दिला आणि आम्ही परत आलो .

दुसऱ्याच दिवशी त्या कंपनीच्या मॅनेजरचा मला फोन आला आणि त्याने सांगितले कि त्याचे फेसबुकचे अकाउंट आहे ते पहा . मग ते हुडकले कारण एकच नावाची अनेक फेसबुक खाती असतात, पण शेवटी त्याचे फेसबुक खाते मिळाले आणि ते पाहिले आणि आश्चर्य कि त्यावर त्याच्या लग्नाचे फोटो होते. विशेष आश्चर्याची गोस्ट अशी कि त्या लग्नाला त्याची बहीण आणि मेव्हणा म्हणजे या बाईची मुलगी आणि जावई सुद्धा हजर होते. ही मुलगी तिच्या सासरी नगरला असते . बरे हि मुलगी साधारणपणे तीन चार महिन्यातून एकदा येऊन आईला भेटून जाते.. तेव्हा त्या बाईंनी आपल्या मुलीला फोन केला तेव्हा तिने सांगितले कि भावाच्या आग्रहास्तव तिने त्याचा ठावठिकाणा सांगितला नव्हता आणि त्याच्या लग्नाची गोष्ट का बरे सांगितली नाही असे विचारले असता तिने सांगितले कि त्याने जातीबाहेर लग्न केले म्हणून तुला सांगितले नाही ,पण त्याचा सध्याचा पत्ता माहित नाही, कुठेतरी कात्रजमध्ये राहतो . आम्ही परस्पर कार्यालयात लग्नाला गेलो आणि परत आलो . नंतर या बाईंनी मुलगा निदान सुखरूप आहे. लग्न करून संसार करतो आहे म्हणून पोलिसात जाण्याचे रहित केले.

नंतर दोन वर्षांनी या बाई परत माझ्याकडे आल्या आणि म्हणाल्या कि माझा भाऊ इतके दिवस या वृध्दाश्रमाचे पैसे भरत होता तो काल मला भेटायला आला आणि त्याने सांगितले कि त्याने सेवानिवृत्तीनंतर आपले सर्व पैसे डी एस कुलकर्णी यांचे कंपनीत ठेवले होते ,पण आता त्याचे व्याज मिळत नाही, त्यामुळे मी दरमहाची रक्कम वृद्धाश्रमात भरू शकणार नाही, माझंच आता अवघड झाले आहे मी आता तुला कुठून पैसे देऊ . मग आता मुलाचा शोध घेतलाच पाहिजे म्हणून आम्ही पोलीस ठाण्यात गेलो आणि त्यांना सर्व सांगितले कि आता मुलाचा शोध लावून द्या. त्यांनी बाईंच्या मुलीला फोन केला आणि विचारले कि तुझ्या भावाचा नेमका पत्ता काय? त्या मुलीने सांगितले कि मला माहित नाही पण तो कुठेतरी कात्रजला राहतो मग आम्ही परत आलो पण दरम्यान च्या काळात त्या मुलीने भावाला फोन केला कि आई पोलिसात गेली आहे आणि पोलीस तुझा शोध घेत आहेत.

त्यामुळे तो मुलगा घाबरला आणि वृद्धाश्रमात येऊन आपल्या आईला घेऊन गेला . पण चार महिन्यांनी परत त्या वृद्धाश्रमात त्या मुलाने आपल्या आईला आणून सोडले पण आश्रमाचे दरमहाचे पैसे मात्र तो भरत होता .

दोन वर्षांपूर्वी त्या परत माझ्याकडे आल्या आणि त्यांनी सांगतले कि सहा महिने झाले कोविडमुळे मुलाची नोकरी सुटली आहे आणि त्यामुळे तो आश्रमाचे पैसे भरू शकत नाही. आश्रमाचे पैसे भरा नाहीतर आश्रम सोडून जावा असा तगादा आश्रमाने लावला आहे मग मी नोकरी करीत होतो त्या आमच्या बँकेच्या स्टाफचे व्हाट्सअँप खात्यावर, तसेच मायाकेअरच्या स्वयंसेवकांच्या व्हाट्सअँप खात्यावर व तसेच फेसबुकवर हा सर्व इतिहास लिहिला आणि त्यांना मदतीचे आवाहन केले आणि सुमारे 16 हजार रुपये, गोळा झाले ते आश्रमात भरले. नंतर त्यांच्या मुलाला नोकरी लागली आणि तो आता त्यांचे पैसे भरतो आहे. त्या बाई आजही वृद्धाश्रमात राहतात.

विद्याधर जोशी, स्वयंसेवक, पुणे



आमचे नागपूरचे स्वयंसेवक महेश बेलखेडे हे गणेश राव तंडाले यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले असताना




अथश्री वृद्धाश्रम नागपूर येथे ज्येष्ठ नागरिकांसोबत रक्षाबंधन साजरा करताना आमच्या स्वयंसेविका सुषमा कामडी.




चंद्रपूर येथे डेबू सावली वृद्धाश्रमामध्ये शासकीय योजनेबद्दल ज्येष्ठांना माहिती सांगताना आमच्या स्वयंसेविका सरला पझारे




शरणपूर वृद्धाश्रम अहमदनगर येथे ज्येष्ठ नागरिकांना गाणी गाऊन दाखवत असताना आमचे स्वयंसेवक बाळासाहेब पिसाळ.



वर्ध्याच्या देवकाबाई मुडे यांना बँक कामांमध्ये मदत करताना स्वयंसेविका सीमा झाडे



कोल्हापूर स्वयंसेविका शितल जोशी या भूपेंद्र शहा यांच्यासोबत हितगुज करत असताना.



सोलापूर स्वयंसेविका अनिता गायकवाड या सुमाताई कुलकर्णी यांना औषध गोळ्या पोहोच करत असताना.



आमच्या पुण्याच्या स्वयंसेविका ज्योती कदम या लिलाबाई ललवाणी यांना वाचन करून दाखवत असताना.



पुण्याचे महेश चित्राव यांच्यासोबत बुद्धिबळ
खेळत असताना आमचे स्वयंसेवक अतुल लेंगरे.



पुण्याच्या स्वयंसेविका पूजा कंदारे
माया केअर जागरुकता करताना.



हडपसर येथील अपंग रोजगार मेळाव्यामध्ये उमेदवाराची
मुलाखत घेताना स्वयंसेवक सोमनाथ बरकडे आणि ज्योती कदम



सायन येथील वृद्धाश्रमात कार्यक्रमाच्या वेळी संस्थापिका मंजिरी
गोखले जोशी, SVP टीम सदस्य, बिंदू टीमचे सहकारी व स्वयंसेवक



आमचे मुंबईचे स्वयंसेवक आमिनाली पंजवानी किंजल वृद्धाश्रमात
ज्येष्ठ नागरिकांना गाणी गाऊन दाखवत असताना




मेट्रोपोलीस हेल्थकेअर मध्ये माया केअरला
Heroes of Healthcare हा पुरस्कार मिळाला



दिगंबर लाळे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना
आमचे पुण्याचे स्वयंसेवक मकरंद निमोणकर



आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत दादासाहेब शुक्ला यांची
मुलाखत घेताना आमचे पुण्याचे स्वयंसेवक महेश कुलकर्णी

Maya CARE Foundation
The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना
मोफत 90 मिनीटांच्या भेटी

*** सेवा ***

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत करा

## MAYA CARE FOUNDATION (INDIA) HELPLINE NUMBERS

| CITY | HELPLINE NO. |
|---|---|
| Pune, Mumbai, Kolhapur, Nagpur, Nasik, Sangli, Solapur, Ahmednagar, Nandurbar, Aurangabad, Buldhana, Akola, Jalgaon, Amravati, Bhopal, Jodhpur, Halkhandi, Guwahati, Jalandhar, Udaipur | 9552510400<br>9552510411<br>9623571845 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

Merchant Name : **MAYA CARE FOUNDATION**
Mobile Number : **7721053535**

* आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
ACCOUNT NO. : 187501000462
IFSC CODE : ICIC0001875

PRINTED MATTER

बुक-पोस्ट

FROM,

**माया केअर फाऊंडेशन**
1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,
सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.
केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

TO,

श्री/श्रीमती ______________________